**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.३६/२०२४ मधील निशाणी ०५ वरील अंतरीम पोटगीचा आदेश**

**(पायल निखिल काळे वि. निखिल राजेंद्र काळे)**

**(CNR No.MHPU170020852024)**

१. सदरचा अर्ज अर्जदाराने महिलांचे कौटूंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा, कलम २३ अन्वये सामनेवाला क्र.१ कडून अंतरीम पोटगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. **अर्जदार यांचे अर्जातील कथन खालीलप्रमाणे –**

अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह दिनांक ०८/०१/२०२४ रोजी झाला. विवाहाचा संपूर्ण खर्च अर्जदाराच्या वडिलांनी केला. विवाहावेळी सामनेवाला यांनी मागणी केल्यामुळे अर्जदाराच्या वडिलांनी त्यांना रक्कम रु.२,२०,०००/– दिले. विवाहानंतर १० ते १५ दिवसांनी सामनेवालाने अर्जदारास त्रास देऊ लागला. सामनेवाला हे अर्जदाराकडून माहेरहून २,००,०००/– रुपये आणण्यासाठी तगादा लावत. ते अर्जदारास जेवण देत नसत. अर्जदाराला माहेरी फोनवर बोलण्यास मज्जाव करत. अर्जदार माहेरहून पैसे आणत नाही म्हणून तिला उपाशी ठेवणे, मारहाण करणे अशा प्रकारे त्रास देत. सामनेवाला यांनी अर्जदाराची प्रकृती बरी नसताना तिला चुकीच्या गोळ्या देऊन तिला शारिरीक त्रास दिला आहे. सामनेवाला हे सामनेवाला क्र.१ चा दुसरा विवाह करणार असे सांगुन अर्जदारास त्रास देत असत. दि.१७/०७/२०२४ रोजी अर्जदाराने भिगवण पोलिस ठाणेत सामनेवाला यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. सामनेवाला क्र.१ ला दारुचे व्यसन असुन त्याने अनेकवेळा अर्जदारास मारहाण केली आहे. सामनेवाला यांच्या त्रासामुळे अर्जदार तिच्या माहेरी राहते.

अर्जदार हिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. सामनेवाला क्र.१ च्या नावे ट्रॅक्टर असुन त्याची बागायात शेती आहे. सामनेवाला क्र.१ ला दरमहा ५० ते ६० हजार रुपये उत्पन्न मिळते. त्यामुळे सामनेवाला क्र.१ कडून अर्जदारास दरमहा रक्कम रु.१२,०००/– अंतरीम पोटगी मिळावी अशी विनंती अर्जदार हिने केली आहे.

३. **सामनेवाला क्र.१ यांनी निशाणी १२ येथे म्हणणे दाखल केले आहे ते खालीलप्रमाणे–**

अर्जदार ही सामनेवाला क्र.१ ची पत्नी आहे हे सामनेवाला क्र.१ ने मान्य केले आहे. विवाहानंतर अर्जदार घरातील कोणतीही जबाबदारी पार पाडत नसुन ती सतत झोपून रहायची अर्जदार ही सामनेवाला यांच्या घरातील कोणत्याही व्यक्तीशी बोलत नसे. अर्जदाराचा विवाह तिच्या मनाविरुद्ध झाला आहे असे ती सांगत असे. अर्जदाराने सामनेवाला यास वैवाहिक सुखापासून वंचित ठेवले आहे. अर्जदार ही सामनेवाला याच्या घरच्यांना अपमानास्पद वागणूक देऊन भांडण काढत असे. अर्जदार ही घरातील दागिने व पावत्या घेऊन पळून गेली होती. त्याकरिता सामनेवाला क्र.१ अर्जदाराच्या माहेरी गेला असता त्याला अर्जदाराच्या माहेरच्या लोकांनी मारहाण केली. सामनेवाला याने त्याविरुद्ध भिगवण पोलिस ठाणेत गुन्हा दाखल केला आहे. अर्जदाराच्या घरच्यांनी पैसे दिले तरच मुलीला नांदायला पाठवू असे सामनेवाला यांना सांगितले आहे.

सामनेवाला क्र.१ मजूरी करतो. सामनेवाला क्र.१ च्या नावे कोणतीही मिळकत नाही. याउलट अर्जदाराची आर्थिक परिस्थिती चांगली असुन तिला शेतीतून उत्पन्न मिळते. त्यामुळे अर्जदार अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र नाही. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती सामनेवाला क्र.१ यांनी केली आहे.

**४.** उभय पक्षांच्या कथनांवरुन खालील मुददे मी माझे विचारार्थ घेतले आहेत व त्यावरील निष्कर्ष त्या खाली दिलेल्या करणांकरीता मांडत आहे –

| **अ.क्र** | **मुददे** | **निष्कर्ष** |
| --- | --- | --- |
| १. | अर्जदार अंतरीम अर्थसहाय्य मिळण्यास पात्र आहे काय ? | **होय.**<br>**दरमहा र.रु.३,०००/–** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशानुसार.** |

## – का र ण मि मां सा –

**५.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

**६.** महिलांचे कौटूंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा, २००५ चे कलम २३ प्रमाणे

प्रकरण प्रलंबित असताना अंतरीम पोटगीची व्यवस्था करण्यात आली आहे. ही व्यवस्था ज्या महिलेला कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागते त्या महिलेची कमाईच्या अभावी उपासमार होऊ नये व तिला आवश्यक असणारी आर्थिक मदत मिळावी जेणेकरुन ती महिला कमीतकमी कायदेशीर लढाई करु शकेल या हेतुने केली आहे.

७. प्रकरणाचे अवलोकन केले असता अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह झाला आहे याबाबत कोणताही वाद उपस्थित झालेला नाही.

**मुद्दा क्र.१ बाबत –**

८. अंतरीम पोटगीच्या अर्जाबाबत निर्णय देताना सर्व प्रथम अर्जदाराला कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागते का हे पहाणे गरजेचे आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार, सामनेवाला क्र.१ तिला दारु पिऊन मारहाण करीत असे, सामनेवाला हे तिच्या माहेरहून पैशाची मागणी करत, तिला उपाशी ठेवत तसेच शिवीगाळ व मारहाण करत असत. याउलट, सामनेवाला क्र.१ चे असे कथन आहे की, अर्जदार ही विवाहानंतर सासरच्या कोणत्याही जबाबदा–या उचलत नसे व तिला सामनेवाला क्र.१ सोबत नांदण्याची इच्छा नाही. तसेच अर्जदार ही सामनेवाला याच्या घरच्यांना अपमानास्पद वागणूक देत असे.

९. अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांच्या कथनांचे अवलोकन करता, त्यांनी एकमेकांवर अनेक आरोप प्रत्यारोप केल्याचे दिसुन येते. परंतु, अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांनी एकमेकांवर केलेले आरोप व प्रत्यारोप यावर त्या दोघांनाही पुराव्याची संधी दिल्याशिवाय कोणतेही भाष्य करणे योग्य ठरणार नाही. अर्जदाराने अर्जात केलेल्या भाष्यावरुन प्रथमदर्शनी सामनेवाला यांना तिचा कौटुंबिक हिंसाचार केला हे पाहणे गरजेचे आहे. अर्जदाराच्या अर्जात सामनेवाला क्र.१ ते ५ यांनी तिला दिलेली वागणूक तिने नमुद केली आहे. तिच्यावर केलेल्या हिंसाचाराच्या घटना तारखेनिशी अर्जात नमुद आहेत. सारासार विचार करता कोणतीही स्त्री गंभीर कारण नसताना तिच्या सासरच्या व्यक्तिंचा त्याग करुन विनाकारण तिच्या माहेरी राहणे पसंत करणार नाही. तसेच तिच्या व सासरच्या व्यक्तिंमध्ये कोणताही वाद नसताना न्यायालयात देखील येणार नाही. अर्जदार ही सामनेवाला क्र.१ सोबत न राहता तिच्या माहेरी राहते. त्यामुळे प्रथमदर्शनी अर्जदाराला कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे

जावे लागले आहे हे स्पष्ट होते.

**१०.** अंतरीम पोटगीच्या अर्जावर निर्णय देताना अर्जदाराकडे आर्थिक कमाईचे साधन आहे का हे पहाणे गरजेचे ठरते. तसेच अर्जदाराकडे आर्थिक कमाईचे साधन नसेल तर सामनेवाला क्र.१ याची अर्जदाराला आर्थिक सहाय्य करण्याची परिस्थिती आहे किंवा नाही हे बघणे महत्वाचे ठरते.

**११.** अर्जदाराने तिच्या अर्जात ती सध्या कमावत असल्याबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही. सामनेवाला क्र.१ ने मात्र अर्जदारास शेतीतून उत्पन्न मिळते असे कथन केले आहे. परंतु सामनेवाला क्र.१ ने अर्जदाराच्या उत्पन्नाबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे अर्जदार कमावती असल्याचे शाबीत होत नाही.

**१२.** अर्जदार ही कमावती नसल्यामुळे तिचा उदरनिर्वाह करण्याची सामनेवाला क्र.१ ची जबाबदारी असल्याने सामनेवाला क्र.१ कमावता आहे का हे पाहणे गरजेचे ठरते. अर्जदाराने तिच्या अर्जात असे कथन केले आहे की, सामनेवाला क्र.१ च्या नावे ट्रॅक्टर असुन त्याची बागायात शेती आहे. सामनेवाला क्र.१ ला दरमहा ५० ते ६० हजार रुपये उत्पन्न मिळते. अर्जदाराने खाते क्र.२७३७, १८५० चे खाते उतारे व गट नं.१५६/१/अ/२, १५६/१/ब व १३१/२ चे ७/१२ उतारे दाखल केले आहेत. परंतु त्यापैकी कोणत्याही कागदपत्रांवर सामनेवाला क्र.१ चे नाव नमुद नाही. त्यामुळे त्या मिळकतींमधुन सामनेवाला क्र.१ ला उत्पन्न मिळते ही बाब शाबीत होत नाही.

**१३.** अर्जदाराने सामनेवाला क्र.१ च्या उत्पन्नाबाबत अन्य कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. परंतु सामनेवाला क्र.१ ने मात्र मालमत्ता व दायित्व प्रमाणपत्रात तो मजूरी करत असल्याचे मान्य केले आहे. यावरुन सामनेवाला क्र.१ हा कमावता आहे हे शाबीत होते. सामनेवाला क्र.१ कडे उत्पन्नाचे साधन असलेने अर्जदाराचा उदरनिर्वाह करण्याची नैतिक व वैधानिक जबाबदारी ही सामनेवाला क्र.१ याचीच आहे. त्यामुळे अर्जदार ही सामनेवाला क्र.१ कडून पोटगीची किती रक्कम मिळण्यास पात्र आहेत हे बघणे आवश्यक ठरते.

**१४.** अर्जदार ही दि.०३/०७/२०२४ पासून माहेरी राहते. सामनेवाला क्र.१ ने दि.०३/०७/२०२४ पासून आजपर्यंत अर्जदारास काही रक्कम दिली असा पुरावा न्यायालयासमोर

नाही. अर्जदाराचा विवाह सामनेवाला क्र.१ सोबत झाला असल्याने तिचा उदरनिर्वाह करणे ही सामनेवाला क्र.१ ची प्राथमिक जबाबदारी आहे. त्यामुळे अर्जदाराच्या उदरनिर्वाहाकरीता व दैनंदिन गरजा भागविण्याकरीता अंतरीम पोटगी म्हणून सामनेवाला क्र.१ ने अर्जदारास दरमहा र.रु.३०००/– देणे योग्य ठरते. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर वरीलप्रमाणे नोंदवून मुद्दा क्र.२ करिता खालील आदेश पारीत करते.

**– आ दे श –**

| | |
|---|---|
| १. | अर्जदाराचा अर्ज अशंतः मंजुर करण्यात येतो. |
| २. | सामनेवाला क्र.१ ने अर्जदारास दरमहा रक्कम रु.३,०००/– (रु.तीन हजार मात्र) अंतरिम पोटगीचा अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून द्यावेत. |
| ३. | अर्जदार हिने पुढील तारखेला स्वतःचा पुरावा दाखल करावा. |
| ४. | अर्ज निकाली होण्यास अर्जदारामुळे विलंब होत असल्याचे दिसून आल्यास अंतरीम पोटगीचा आदेश रद्द करण्यात येईल. |
| ५. | खर्चाबाबत आदेश नाही. |
| ६. | आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांना मोफत देण्यात यावी. |

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2025.09.11 18:52:49 +0530

**(प्राजक्ता राजीव सबनीस)**

**दि. ११/०९/२०२५**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,**
**ता.इंदापूर, जि.पुणे.**